नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०९/२०२४ (गुरूवार) सकाळ

---

## घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद
## (स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई)

नागपूर ग्रामीण घटकाअंतर्गत घरफोडी करुन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात विशेष पथके तयार केले. विशेष पथकाने जिल्हयातील विवीध पोलीस स्टेशनला नोंद गुन्हयांचा अभ्यास करुन प्रत्येक घरफोडीच्या घटनेमधील आरोपीच्या गुन्हे करण्याच्या कार्यपध्दतीवर केंद्र लक्षीत करुन समांतर तपास सुरु केला. तपासादरम्यान प्राप्त गोपनिय माहीती व तांत्रिक माहितीचे आधारे **गुन्हेगार नामे– अब्दुल सोहेल उर्फ शोबु अब्दुल खालिद वय २४ वर्ष, रा. सतरंजीपुरा नागपूर** याचा पोस्टे काटोल येथील अप. क्र. ६७०/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS या घरफोडी गुन्हयामध्ये सहभाग असल्याची खात्रीशीर माहीती समोर आल्याने पथकाव्दारे त्याचा तात्काळ शोध सुरू करून त्यास रेशीमबाग नागपूर येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडे बारकाईने विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा तसेच उमरेड, भंडारा येथेही दिवसा घरफोडी केल्याची कबुली दिल्याने आरोपीकडुन खालील नमुद पोलीस स्टेशन हद्दीत झालेल्या घरफोडीच्या घटनेतील चोरी गेलेले १) एक one plus कंपनीचा मोबाईल फोन किंमती १५,०००/– रू. गुन्हयात वापरलेली २) होंडा ॲक्टिवा वाहन क्र. MH/49 AW 3587 की. ५०,०००/– रू. असा एकूण ६५,०००/– रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. वरील आरोपीकडून नागपूर ग्रामीण, भंडारा जिल्हयातील असे एकुण ०४ गुन्हे उघड करण्यात आले आहे. यातील नमूद आरोपी याची मेडिकल तपासणी करून व जप्त मुद्देमालासह पो.स्टे. काटोल यांचे ताब्यात पुढील कार्यवाही कामी देण्यात आले.

**नागपूर ग्रामीण येथील**

१) पो. स्टे. काटोल अप क्र. ६७१/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS
२). पो. स्टे. उमरेड अप क्र. ३०५/२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS
३) पो.स्टे. उमरेड अप. क्र. ३१५/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS
४) पो. स्टे. भंडारा अप. क्र. ६२७/२०२४ कलम ३३१(३), ३०५ (A) BNS

कार्यवाही पथक मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार सर भापोसे तसेच अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनी. आशिषसिंह ठाकूर, ASI मिलिंद नांदूरकर, ASI विनोद काळे, पोहवा प्रमोद तभाने, पोहवा इकबाल शेख, पोहवा दिनेश आधापुरे, पोहवा रोशन काळे, पोहवा संजय बरोदिया, पोहवा प्रमोद भोयर, पोहवा रोहन डाखोरे, पोअं अमित मेहरे, धोंडूतात्या देवकत्ते, पोना सतिष राठोड सायबर सेल, पोअं. मृणाल राउत, चालक पोहवा अमोल कुथे, आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर